नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३
सरकार वि. संजय वगैरे
निशाणी ४२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– बाळासाहेब संभाजी गायकवाड
**वय** :– ४१ वर्षे, **धंदा** :– शेती
**राहणार** :– शेटफळे, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री बी.डी.काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

**०१.** माझ्या घरी मी, भाऊ, भावजय, आई–वडील असे एकत्र राहतो. घटना दिनांक ०६/०६/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता घडली. त्यादिवशी माझा भाऊ धोंडीराम हा शेळ्या चारत होता. त्यावेळी तेथे मेन रोडला चारचाकी लावून आरोपी क्र.१ संजय गायकवाड, रामराव गायकवाड, मनिषा गायकवाड हे माझ्या भावाजवळ आले. संजय गायकवाड, रामराव गायकवाड, मनिषा गायकवाड यांनी दगडे भिरकावून ''या रानात यायचे नाही'' असे म्हणाले. माझा भाऊ धोंडीराम हा शेडमध्ये शेळ्या कोंडून परत घरी जात असताना विजय गायकवाड, वैशाली गायकवाड यांनी ''तु कुठे चालला आहेस'' असे म्हणून ''तुला आता जिवंत ठेवत नाही'' अशी धमकी दिली. माझा भाऊ काही न बोलता गावामध्ये आला.

**०२.** संध्याकाळी ०८.०० वाजता आम्ही सर्वजण घरात एकत्र बसलो असताना, संजय गायकवाड, विजय गायकवाड, रामराव गायकवाड, वैशाली गायकवाड, मनिषा गायकवाड हे सर्वजण मिळून आमच्या घरी येवून आम्हाला मारहाण करु लागले. त्यानंतर संजय गायकवाड याने त्याच्या हातातील कु–हाडीने भाऊ धोंडीराम याच्या डोक्याच्या उजव्या बाजूला मारहाणक केली. विजय गायकवाड याने त्याच्या हातातील काठीने माझ्या डोक्यावर आणि नाकावर मारहाण केली. त्यानंतर विजय गायकवाड याने माझे वडील संभाजी परसू गायकवाड यांना देखील धक्का–बुक्की केली, मारहाण केली. वैशाली व मनिषा यांनी माझी आई सुमन व भावजय सुवर्णा यांना लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली.

०३. आमच्या भांडणाचा कालवा ऐकून आमच्या घराशेजारील भारत रावसाहेब पाटील, शहाजी दगडू पाटील यांनी आमच्या भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर आम्ही आटपाडी पोलिस ठाण्यात आलो असता, त्यांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात जाण्यासाठी चिट्ठी दिली. सरकारी दवाखान्यात आम्हाला चार तास बसवून उपचार करुन परत आम्हाला आटपाडी पोलिस ठाण्यास जाण्यास सांगितले. त्यानंतर धोंडीरामने पोलिस ठाण्यात रितसर तक्रार दिली. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी रामराव न्यायालयात हजर आहेत. इतर आरोपी हजर नाहीत. दुस–यादिवशी आम्हाला सांगली येथे सिटी स्कॅन करण्यासाठी पाठविले होते. सिटी स्कॅन झाल्यानंतर आम्ही परत घराकडे आलो.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एम.एम.पाटील, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

०४. माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जनावरांचा डॉक्टर म्हणून मी व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व्हेटरनिरीचे शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पूर्वी जनावरांच्या डॉक्टराचा व्यवसाय करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, या न्यायालयात माझ्या विरुध्द विविध फौजदारी खटले दाखल झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी या न्यायालयात इतर लोकांविरुध्द इतर खटले दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बनपुरी,मिटकी या परिसरातील काही लोकांविरुध्द मी मारहाणीबाबतचे खटले न्यायालयात दाखल केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस बनपुरी येथील महिलांनी माझ्याविरुध्द छेडछेडाचा खटला दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की यापूर्वी या न्यायालयात माझ्याविरुध्द छेडछेडी विनयभंगाचा खटला दाखल झाला होता. साक्षीदार सांगतात की, त्या गुन्ह्यामध्ये मी निर्दोष झालो आहे.

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व आरोपीच्या कुटूंबात विविध दिवाणी दावे, अपिले यापूर्वीही झालेले आहेत व आजही आहेत. त्या प्रकरणांबद्दल मला व्यक्तीशः माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावे हे एकत्रीकरण प्रकरणाची आहेत. हे म्हणणे खरे नाही की एकत्रीकरणाबाबत आमच्यात व आरोपींदरम्यान सांगली,

नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३
सरकार वि. संजय वगैरे
निशाणी ४२

विभागीय कार्यालये, आयुक्त कार्यालय व मंत्रालय याठिकाणचे सर्व निकाल आरोपीच्या बाजूने लागले आहेत. हे म्हणणे खरे आहे की आम्ही मंत्रालयात अपिल दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सातबारा उता–यावरती आमचे आणि आरोपींचे क्षेत्र वेगवेगळे आणेवारीत आहेत.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, रामराव गायकवाड नोकरीनिमित्त मुंबईला होते. साक्षीदार सांगतात की, ते सेवानिवृत्त होवून २० वर्षे झालेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र.२ विजय आणि आरोपी क्र.५ वैशाली हे नोकरीनिमित्त मुंबई येथे नेरूळ याठिकाणी असतात. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र.३ व ४ हे नोकरीनिमित्त गुजरात येथे असतात. हे मला माहित नाही की आरोपी विजय आणि संजय यांचे शिक्षण काय झाले आहे. ते व्यवसाय, कामधंदा व नोकरी काय करतात याबद्दल मला वैयक्तिक माहिती नाही.

**आरोपींच्या वकीलांना उलटतपास घेताना चक्कर येत असल्याने त्यांचे तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.10.30 12:48:00 +0530

दि. ३०/१०/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी